www. sahyandrinews.com
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे
गुढीपाडवा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १४७ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.३० मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राज्यातील ५६० गोशाळांच्या खात्यात २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान जमा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ५६० गोशाळांच्या खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.जानेवारी , फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्य गोसेवा आय़ोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विकासाचे गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे. देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड - अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पशुधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून, यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले.ऑनलाईन अनुदान वितरण प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.



### असे आहे योजनेचे स्वरुप

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५०/- प्रती दिन प्रती देशी गाय

### अनुदान पात्रतेच्या अटी

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र. संस्थेस गोसंगोपनाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंश असणे आवश्यक. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगिंग करणे अनिवार्य. ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

### विकासाची महागुढी उभारू या! राष्ट्रधर्म वाढवू या!

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मराठी नववर्ष प्रारंभ गुढीपाडव्याच्या शुभेच्छा

## नूतन वर्ष सर्वांच्या जीवनात,सर्व क्षेत्रात नवचैतन्य, ऊर्जा घेऊन येवो

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राचा वाटा अनन्यसाधारण आणि राष्ट्रधर्माचा वसा आहे. हा वसा घेऊन राज्याच्या, देशाच्या विकासाचा एकजुटीने निर्धार करूया. हा राष्ट्रधर्म वाढवू या, विकासाची महागुढी उभारू या! असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना मराठी नववर्ष प्रारंभ गुढीपाडव्याच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आहेत.नूतन वर्ष राज्यातील शेतकरी, कष्टकरी, कामगारांच्या जीवनात आणि उद्योजकता, व्यापार - उदीम अशा सर्वच क्षेत्रात नवचैतन्य, ऊर्जा घेऊन येवो. सर्वांकरिता सुख- समृद्धी, समाधान आणि भरभराटीचे क्षण घेऊन येवो, अशी मनोकामना देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.



गुढीपाडव्याच्या पुर्वसंध्येला दिलेल्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांनी खंडप्राय भारतवर्षाचे वैभव वृद्धिंगत करण्याचा कळसाध्याय रचला. त्यांच्याकडून प्रखर राष्ट्रभक्ती- स्वराज्य, स्वधर्म आणि स्वाभिमानाची प्रेरणा मिळाली. शिवछत्रपतींच्या आशीर्वादाच्या छत्रछायेखाली महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्र आज शेती- सिंचन, शिक्षण - आरोग्य, उद्योग - गुंतवणूक, ऊर्जा - तंत्रज्ञान यांसह सामाजिक न्याय, महिला सबलीकरण तसेच साहित्य- कला- क्रीडा आणि सांस्कृतिकदृष्ट्या अग्रेसर आहे. या वाटचालीत अनेक थोरांचे, धुरिणांचे योगदान आहे. त्यांनी दिलेला हा राष्ट्रधर्माचा वसा आहे. हा वसा घेऊनच आपल्याला विकसित भारताचे स्वप्न - संकल्प साकार करण्यात विकसित महाराष्ट्र म्हणून वाटा उचलायचा आहे. त्यासाठी आपल्याला एकजूट आणि निर्धार करायचा आहे. त्यासाठी आपल्याला हे नववर्ष निश्चितच प्रेरणादायी ठरेल. विकासाच्या संकल्पना, सामाजिक न्यायाच्या योजना, पायाभूत सुविधांचे महत्वकांक्षी प्रकल्प साकारण्यासाची ऊर्जा घेऊन येईल अशी मनोकामना व्यक्त करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्यातील तरूणांच्या उद्योग - व्यवसायातील नवसंकल्पना, शिक्षण - तंत्रज्ञान आणि संशोधनांच्या पंखात भरारीचे बळ लाभावे अशा सदिच्छा व्यक्त केल्या आहेत. हे नववर्ष नागरिकांच्या जीवनात धनधान्य, पशुधनाची समृध्दी आणि भरभराट घेऊन येवो, निसर्गाची कृपा घेऊन येवो, अशी प्रार्थनाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

# केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड १०वी च्या परीक्षांवर पुनर्विचार करणार

## खासदार धानोरकर यांच्या पत्राची दखल




**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्डाने (CBSE) नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत १०वीच्या परीक्षेच्या पद्धतीत बदल करण्याचा प्रस्ताव मांडला होता, ज्यामध्ये दोन वेळा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला गेला होता. मात्र, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक तणावाची दखल घेत खासदार सुरेश धानोरकर यांनी उइडए ला पत्र पाठवून परीक्षा पद्धतीत बदल न करण्याची मागणी केली होती.CBSE ने या मागणीची दखल घेत परीक्षेच्या नव्या स्वरूपावर पुनर्विचार करण्याचे पत्राद्वारे कळवले आहे. नवीन परीक्षा पद्धतीनुसार मार्च आणि मे महिन्यात दोन वेळा परीक्षा घेण्याचा प्रस्ताव होता. मात्र, विदर्भ आणि महाराष्ट्रासह संपूर्ण देशात या कालावधीत तीव्र उष्णता असल्याने विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक तणाव सहन करावा लागणार होता. यासोबतच शाळांसाठीही ही परीक्षा पद्धती अडचणीची ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले होते.खासदार धानोरकर यांच्या शिफारशीला CBSE ने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. जर हा बदल मान्य झाला, तर विद्यार्थ्यांसाठी आणि शाळांसाठी ही अधिक सोयीची परीक्षा पद्धती असेल.

# डीसीपी सुधाकर पठारे यांचा अपघातात मृत्यू

**मुंबई । प्रतिनिधी**


डीसीपी सुधाकर पठारे यांचा अपघातात मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पठारे हे नातेवाइकांसोबत ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जात असताना एका रस्ते अपघातात मृत्युमुखी पडले आहेत.



यात दोघांनी आपला जीव गमावला आहे. तेलंगणा तील नगर कुरनूल येथील श्रीशैलम जवळ आज रस्ते अपघातात महाराष्ट्रातील २०११ चे खझड सुधाकर पठारे आणि भागवत खोडके यांचे निधन झाल्याची दुःखद बातमी समोर आली आहे.

डॉ. पठारे हे २०११ सालचे ते आयपीएस आहेत. ते मूळचे वाळवणे (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथील रहिवासी आहेत. आयपीएस होण्याअगोदर ते शासनाच्या वेगवेगळ्या खात्यांमध्ये अधिकारी म्हणून राहिले आहेत. डॉ. सुधाकर पठारे यांचे शिक्षण एम.एस्सी. ग्री, एलएलबी झालेले आहे. स्पर्धा परीक्षा देत असताना १९९५ साली ते जिल्हा विशेष लेखा परीक्षक झाले. यानंतर १९९६ साली विक्रीकर अधिकारी वर्ग १ म्हणून त्यांची निवड झाली. १९९८ साली पोलिस उपअधीक्षक म्हणून त्यांची निवड झाल्यानंतर पोलिस खात्यातच ते रमले. आतापर्यंत त्यांनी पोलिस उपअधीक्षक म्हणून पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर शहर, राजुरा येथे सेवा बजावली आहे.अप्पर पोलिस अधीक्षक म्हणून चंद्रपूर, वसई तर पोलिस अधीक्षक म्हणून सीआयडी अमरावती येथे सेवा बजावली आहे. पोलिस उपायुक्त म्हणून मुंबई, ठाणे, पुणे, वाशी, नवी मुंबई, ठाणे शहर येथे सेवा बजावली आहे. एसपी डॉ. सुधाकर पठारे यांनी पोलिस खात्यात सेवा बजावताना संघटित गुन्हेगारी (मोक्का), तडीपारी, एमपीडीए अशा प्रतिबंधात्मक कारवाईचा धडाका लावला होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच पोलिस दलात अनेक विविध उपक्रम राबवले आहेत.



# गुढीपाडवा : नववर्षाचे स्वागत आणि नवचैतन्याचा उत्सव

गुढीपाडवा म्हणजे विजय, समृद्धी आणि नवसंकल्पांची गुढी उभारण्याचा दिवस. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून सुरू होणारे हिंदू नववर्ष महाराष्ट्रात गुढी उभारून मोठ्या जल्लोषात साजरे केले जाते. हा दिवस केवळ धार्मिक महत्त्वाचा नसून, तो ऐतिहासिक, सांस्कृतिक, कृषी आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही विशेष आहे. विदर्भात गुढीपाडव्याला मांडवस असेही म्हणतात, आणि या दिवशी शेतीविषयक नवी कामे सुरू करण्याची परंपरा आहे.

गुढी उभारण्यामागे विविध ऐतिहासिक संदर्भ आहेत. रामायणानुसार प्रभू श्रीरामाने रावणाचा पराभव करून अयोध्येत प्रवेश केला, त्यावेळी नगरवासीयांनी आनंदाच्या गुढ्या उभारल्या. महाभारतातही पांडवांनी अज्ञातवास संपल्यावर गुढ्या उभारून विजय साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर गुढ्या उभारून आपल्या विजयाचा उत्सव साजरा केला होता. त्यामुळे गुढी हे विजयाचे, स्वाभिमानाचे आणि नवचैतन्याचे प्रतीक आहे.या दिवशी घराघरासमोर गुढी उभारली जाते. बांबूला रेशमी वस्त्र, फुलांचा हार, कडुलिंबाच्या पानांचा तोरण, साखरेच्या गाठी आणि तांब्याच्या किंवा चांदीच्या भांड्याने सजवलेली गुढी उंच उभारली जाते. याला समृद्धी, मंगलकारकता आणि विजयाचे प्रतीक मानले जाते. गुढी उभारल्याने घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे मानले जाते.गुढीपाडवा हा सण ग्रामीण भागात विशेष महत्त्वाचा मानला जातो. विदर्भात मांडवस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दिवसाचा शेतीशी विशेष संबंध आहे. या दिवशी शेतीसाठी नवीन सालगडी ठेवण्याची प्रथा आहे. शेतकरी नवीन कामगार ठरवतात, वर्षभराच्या शेतीच्या कामाची बोलणी करतात आणि या नात्याची सुरुवात गोडधोड खाऊन होते. याच दिवशी शेतीसाठी बैलांची सजावट केली जाते, त्यांची पूजा केली जाते आणि शेतात नवीन कामांना प्रारंभ केला जातो. गुढीपाडव्याच्या सणानंतर ग्रामीण भागात शेतीच्या नव्या हंगामाची सुरुवात होते. या दिवसापासून निसर्गही नव्या रुपात सजतो. वसंत ऋतूच्या आगमनाने झाडांना नवी पालवी फुटते,



वातावरणात प्रसन्नता येते. शेतकरी नवीन पीक हंगामाच्या तयारीला लागतात आणि यासाठी गुढीपाडवा हा शुभ दिवस मानला जातो. गुढीपाडव्याच्या निमित्ताने बाजारपेठांमध्ये मोठी चहल-पहल दिसून येते. नवीन कपडे, दागिने, वाहन खरेदी, गृहसजावट आणि शेतीची साधने खरेदीसाठी हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. व्यापारी नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करतात. गृहिणी नवीन भांडी, सुवासिक उटणे, आभूषणे, पूजासामग्री यांची खरेदी करतात. ग्रामीण भागातही शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांची खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जाते.गुढीपाडवा हा केवळ सण नसून नवीन संकल्प आणि नवचैतन्याचा दिवस आहे. समाजाच्या विकासासाठी नवीन संकल्प करण्याचा हा दिवस आहे. पर्यावरणसंवर्धन, सामाजिक सलोखा, आरोग्यपूर्ण जीवनशैली आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रगती साधण्याचा संकल्प आपण या गुढीपाडव्याला करू शकतो. आजच्या युगात गुढीपाडव्याचा अर्थ केवळ गुढी उभारण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. आजच्या काळात हा सण सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, सामाजिक ऐक्य आणि महिला सशक्तीकरण या क्षेत्रांमध्ये योगदान देण्याचा संकल्प आपण या गुढीपाडव्याला करू शकतो. गुढीपाडवा हा सण संस्कृती, परंपरा, निसर्ग आणि समाज यांचा संगम घडवतो. आपल्या आयुष्यातील यशाची गुढी उभारण्यासाठी प्रत्येकाने नवा संकल्प करावा. जीवनात सकारात्मकता, विजय आणि समृद्धी यावी, हीच गुढीपाडव्याच्या निमित्ताने शुभेच्छा!गुढीपाडव्याच्या आणि मांडवसच्या हार्दिक शुभेच्छा!

# कागदोपत्री हिणवलेला विकास प्रत्यक्षात; विद्यमान आमदारांचचा कामांवर दावा-ॲड.अजित विघ्ने

**सोलापूर । प्रतिनिधी**

माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी आपल्या कार्यकाळात महाविकास आघाडी आणि महायुती सरकारच्या माध्यमातून करमाळा तालुक्यासाठी ३४९० कोटी निधी मंजूर करून आणला होता. मात्र, कोरोना संकट आणि राजकीय अस्थिरतेमुळे या निधीतून विकासकामे सुरू होऊ शकली नव्हती. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी हा विकास कागदोपत्री असल्याचा आरोप केला होता, पण आता हाच विकास करमाळा मतदारसंघात प्रत्यक्षात दिसू लागला आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते एड. अजित विघ्ने यांनी टीका करताना सांगितले की, ही कामे आम्हीच मंजूर केली होती असे सांगत विद्यमान आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना दमदाटी केली जात आहे.विधानसभा निवडणुकीनंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये सत्तांतर झाले, मात्र त्यानंतर चार महिन्यांच्या कालावधीत विद्यमान आमदार एक रुपयाचाही निधी मतदारसंघासाठी मंजूर करून आणू शकलेले नाहीत, असा आरोप विघ्ने यांनी



केला. राज्य सरकारच्या चालू अर्थसंकल्पात करमाळा तालुक्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

### माजी आमदारांच्या कार्यकाळातीलच कामे सुरू

**माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या कार्यकाळात मंजूर झालेली एक हजार कोटींची विकासकामे २०२५ मध्ये सुरू झाली आहेत. मात्र, विद्यमान आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून ती कामे आम्हीच मंजूर केल्याचा दावा केला जात आहे, असे विघ्ने यांनी सांगितले.**

### नियोजनशून्य कारभारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**करमाळा तालुक्यातील दहिगाव योजना आणि कुकडी प्रकल्पांतून झालेल्या पाण्याच्या वाटपातही अनागोंदी कारभार सुरू आहे. ५० टक्क्यांपेक्षा अधिक गावे अजूनही पाण्यापासून वंचित आहेत. सोशल मीडियावर पाणीदार आमदार अशी प्रतिमा निर्माण करण्यासाठी व्हिडिओ आणि जाहिरातबाजीवर भर दिला जात आहे, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, असा गंभीर आरोप ॲड. अजित विघ्ने यांनी केला.**

# महात्मा गांधी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये शिक्षक-पालक सभा संपन्न




**सोलापूर । प्रतिनिधी**

नामसाधना मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये कॉफी विथ पेरेंट्स या उपक्रमांतर्गत शिक्षक-पालक सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी शंभूराजे जगताप होते. व्यासपीठावर प्राचार्य बी. के. पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षक रमेश भोसले, दत्तात्रय भागडे, शरद जाधव यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सभेची सुरुवात माता सरस्वती आणि स्व. नामदेवराव जगताप यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. पालकांनी शाळेच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी काही सूचना मांडल्या. यावेळी उपप्राचार्य अनिस बागवान आणि प्राचार्य बाळकृष्ण पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

शंभूराजे जगताप यांनी अध्यक्षीय भाषणात तालुक्यातील एक मॉडर्न शिक्षणसंस्था म्हणून शाळेचा विकास करण्याचा निर्धार व्यक्त केला. संस्थाध्यक्ष माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन प्रशस्त इमारत, स्कूल बस सेवा, डिजिटल क्लासरूम्स आणि संस्कृत विषय उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. उन्हाळी शिबिरांतर्गत घोडेस्वारी, स्विमिंग, बुद्धिबळ, कराटे आणि इतर क्रीडा उपक्रम राबवले जातील, असेही त्यांनी सांगितले.सभेच्या शेवटी क्टिव्ह पेरेंट्स म्हणून श्रीयरी भोगल, गणेश गुटाळ, शितल माकुडे, सारिका धायतोंडे, प्रियंका नलवडे यांचा सन्मान करण्यात आला. सभेचे आभार कोरडे यांनी मानले.

## चैतन्याचा साज




आज चैत्र शुद्ध । तो गुढीपाडवा ।
मिळतो गोडवा । संस्कृतीचा ।।

आले नववर्ष । चैतन्याचा साज ।
समृद्धीची आज । गुढी करु ।।

करूया तोरण । आंब्याच्या पानांचे ।
हार ते फुलांचे । बांधू घरी ।।

रंगीत वस्त्राने । गुढी सजवुनी ।
तांब्याला बांधुनी । गाठी पाने ।।

कडूनिंब देई । आरोग्य आधार ।
सदा सुसंस्कार । शिकविते ।।

गर्व संस्कृतीचा । गुढी उंचावर ।
मना मनावर । संस्कार ते ।।

गुढी स्थैर्यासाठी । लाभोत सौभाग्य ।
सुदृढ आरोग्य । समाधानी

माया आपुलकी । स्नेह मूल्य नीती ।
विश्वासाने प्रीती । जपूयात ।।

पाडव्याला पूर्ण । होतील कामना ।
लाभोत जीवना । यश किर्ती ।।

**सौ.भारती राजू
लखमापूरे रोडे वरोरा जि.चंद्रपूर**

# सिंदी (मेघे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेचा प्रश्न सुटला

**वर्धा । प्रतिनिधी**

सिंदी (मेघे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नांमुळे हा अडथळा दूर झाला आहे. यामुळे येथील नागरिकांना आरोग्य सुविधा सुलभ होणार आहेत.

वर्धा शहरात नागरी वस्ती झपाट्याने वाढत असून, जिल्हा सामान्य रुग्णालय, सेवाग्राम व सावंगी मेडिकल दूर असल्याने नागरिकांना आरोग्य सुविधांसाठी अडचणी येत होत्या. यावर तोडगा म्हणून आ. डॉ. पंकज भोयर यांनी सिंदी (मेघे), बोरगाव (मेघे), साटोडा, पिपरी (मेघे) आणि सालोड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत १५ फेब्रुवारी २०२३ रोजी पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांना मंजुरी मिळाली.



सिंदी वगळता अन्य चार ठिकाणच्या जागेचा प्रश्न आधीच सुटला होता. मात्र, सिंदी (मेघे) येथे जागेचा अडथळा निर्माण झाला होता. पालकमंत्री भोयर यांच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करून सर्व्हे क्र. १२९ मधील एक हेक्टर जागा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी निश्चित केली. त्यामुळे येथील आरोग्य केंद्राच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.बोरगाव (मेघे) आणि साटोडा येथे नव्याने मंजूर झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी प्रत्येकी ६ कोटी रुपयांचा निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय, हिंगणी येथे जंगलव्याप्त परिसरात पीएचसी उभारण्यासाठी आ. भोयर यांनी विशेष प्रयत्न केले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष मान्यतेमुळे हिंगणी येथे जिल्ह्यातील सर्वात मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले गेले आहे.

## उंभर्टी येथील जिल्हा परिषद शाळेचा नावलौकिक

# प्रणव ठाकरे जिल्ह्यात प्रथम युक्ती सोनवणे तालुक्यात अव्वल

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद मराठी शाळा, उंभर्टी येथील विद्यार्थ्यांनी अपूर्व यश मिळवत शाळेचे आणि गावाचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले आहे. परीक्षेत इयत्ता तिसरीचा विद्यार्थी प्रणव दिपक ठाकरे हा संपूर्ण धुळे जिल्ह्यात प्रथम, तर इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी युक्ती प्रविण सोनवणे ही तालुक्यात प्रथम आली आहे.

प्रणव ठाकरे हा दिपक बसंत ठाकरे यांचा सुपुत्र, तर युक्ती सोनवणे ही प्रविण सुभाष सोनवणे यांची कन्या आहे. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळा आणि गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या उल्लेखनीय यशामागे मुख्याध्यापक प्रशांत पांडुरंग पाटील, उपशिक्षक कालू भारुडे, उज्वला देवरे यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम कारणीभूत ठरले. शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे उंभर्टी शाळेचा जिल्ह्यात नावलौकिक झाला आहे.गावकऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# काँग्रेस पक्षात संघटनात्मक फेरबदलाची प्रक्रिया सुरु:काँग्रेस पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी जिल्हानिहाय निरीक्षकांची नियुक्ती

**मुंबई (वृत्तसंस्था)**–काँग्रेस पक्षाला नवी ऊर्जा आणि बळ देण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संघटनात्मक फेरबदलाची प्रक्रिया सुरु केली आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून आज काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची जिल्हानिहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानंतर संघटनेत बदल करण्यात येणार आहेत.

फेरबदलाच्या या प्रक्रियेत मंडल स्तरापासून प्रदेश पातळीपर्यंत काँग्रेस संघटना मजबूत करण्यासाठी आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. रिक्त पदावर नियुक्त्या करण्यात येणार आहेत. तसेच जिथे आवश्यक आहे तिथे नवीन चेहऱ्यांना जबाबदारी दिली जाणार आहे. या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या निरीक्षकांची बैठक आज प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, प्रफुल्ल गुडदे पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ड. गणेश पाटील, मोहन जोशी उपस्थित होते. या बैठकीत प्रांताध्यक्षांनी निरीक्षकांना यासंदर्भात सूचना केल्या. हे सर्व निरीक्षक त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून



१५ दिवसांत प्रदेश काँग्रेसला आपला अहवाल सादर करणार आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संघटनात्मक फेरबदलांच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.गुजरात मधील जातीय दंगलीतून, हिंदू मुस्लिम दंग्यातून स्वतःचे नेतृत्व पुढे आणणारा माणूस जर आता सौगात सारख्या गोष्टी करत असेल तर त्याबद्दल ऐवढेच बोलावे की सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली. यासोबतच दरवर्षी दोन कोटी बेरोजगारांना नोकरी देणार त्याचे काय झाले ? शेतकऱ्यांच्या शेतमालाला दीडपट भाव देणार त्याचे काय झाले ? काळा पैसा विदेशातून आणणार त्याचे काय झाले ? पेट्रोल ४० रु. डिझेल ३५ रु. या पण मोदींच्या घोषणांची सौगातच होती त्याची आज देश वाट पाहत असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# वैजापूर तालुक्यात पुन्हा बिबट्याचा हल्ला-तीन वर्षीय मुलीचा मृत्यू

**वैजापूरे । प्रतिनिधी**

तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ सुरूच असून वळण शिवारात तीन वर्षीय मुलगी हल्ल्यात ठार झाली. ऋतुजा सचिन कर्डक (रा. तांदुळवाडी, ता. गंगापूर) ही मुलगी मामाच्या गावी वळण (ता. वैजापूर) येथे आली होती. संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक ७७ मध्ये बिबट्याने अचानक हल्ला केला.या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या ऋतूजाला वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.



याच परिसरात एक महिन्यापूर्वी दहा वर्षीय मुलावरही बिबट्याने हल्ला करून त्याला ठार केले होते. या सततच्या हल्ल्यांमुळे वळण व परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र भीती पसरली आहे.कापूस वेचणी, ज्वारी सोंगणी, कांदा काढणीसाठी शेतकऱ्यांना शेतात जाताना मोठ्या धोक्याचा सामना करावा लागत आहे. महिलांना संरक्षणासाठी पुरुषांना बरोबर जावे लागत आहे. ग्रामस्थांनी वनविभागाला वारंवार सूचना दिल्या असतानाही बिबट्याला जेरबंद करण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.अजून किती निष्पाप जीव गेल्यानंतर प्रशासन झोपेतून जागे होईल? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. त्यांनी बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करण्याची मागणी केली आहे.

# इनर व्हील क्लब हिंगणघाटची अधिकृत क्लब भेट संपन्न
# डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्री पोफळे कडून विशेष कौतुक



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

इनर व्हील क्लब हिंगणघाटची अधिकृत क्लब भेट (जउत) दिनांक २२ मार्च रोजी उत्साहात पार पडली. या प्रसंगी मालेगाव, नाशिक येथून डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्री पोफळे विशेष उपस्थित होत्या. ही बैठक इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ. रूपल कोठारी यांच्या हॉस्पिटलमध्ये संपन्न झाली, जिथे क्लबच्या कार्यकारी सदस्यांनी वर्षभरातील प्रकल्पांचा अहवाल सादर केला.बैठकीपूर्वी जयश्री पोफळे यांनी क्लबच्या विविध प्रकल्पांचा प्रत्यक्ष दौरा केला. त्याच वेळी, महादेव मंदिर, आठवडी बाजार, हिंगणघाट येथे एका पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले आणि दोन गरजू रस्त्यावरील विक्रेत्यांना इनर व्हील क्लबच्या वतीने छत्र्या भेट देण्यात आल्या.इनर व्हील क्लब हिंगणघाटने शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि समाजसेवेच्या विविध क्षेत्रांमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. क्लबने जीव रक्षक फाउंडेशनसारख्या संस्थांना मदत करून निराधार प्राण्यांच्या सेवेसाठीही हातभार लावला आहे. या कार्याची डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्री पोफळे यांनी विशेष प्रशंसा केली.संध्याकाळी तुळसकर सभागृहात क्लबच्या इतर सदस्यांसोबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली, जिथे डिस्ट्रिक्ट चेअरमन यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, स्थानिक संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या प्रकल्पांना गौरवण्यात आले. यात पथनाट्य, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, पार्लर आणि मेहेंदी कोर्स यांचा समावेश होता. या संस्थांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, एका दिव्यांग मुलाला वॉकिंग स्टँड भेट स्वरूपात प्रदान करण्यात आला.महिला सशक्तीकरणाच्या उद्देशाने डॉ. नैना तुळसकर आणि संगीता गढवाल यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी विशेष सन्मानित करण्यात आले.या वर्षी इनर व्हील क्लबच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्त हिंगणघाट क्लबने केवळ काही महिन्यांत १०१ प्रकल्प पूर्ण करून एक आदर्श निर्माण केला. या उल्लेखनीय कार्याबद्दल क्लबला विशेष सन्मान मिळाला. तसेच, यावर्षीची इनर व्हील असेंब्ली देखील हिंगणघाट येथे आयोजित केली जाणार आहे.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन वर्षा परबत यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुमुद व्यास यांनी केले. क्लबच्या सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोठा सहभाग घेतला. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ हिंगणघाटचे अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी, इनर व्हील क्लब हिंगणघाटने समाजसेवेसाठी आणखी प्रभावी प्रकल्प हाती घेण्याचा संकल्प केला, ज्याचे डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्री पोफळे यांनी भरभरून कौतुक केले.

## शक्तीपीठ महामार्गामुळे, देवळी होणार तटबंदीचे शहर

**देवळी । प्रतिनिधी**

८०२ किमी लांबीच्या शक्तीपीठ महामार्गाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७ मार्च रोजी विधीमंडळात घोषणा करताच शहरात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. प्रस्तावित महामार्ग समृद्धी महामार्गासारखा उंच भिंतीचा असल्याने देवळी शहर चारही बाजूंनी बंदिस्त होणार आहे. त्यामुळे अनेक नागरिक आणि शेतकऱ्यांनी या महामार्गाला विरोध दर्शविला आहे.एन.एच. ३६१ च्या चौपदरीकरणांतर्गत एस.एस.एन.जे. महाविद्यालय ते यशोदा नदीपर्यंतच्या ४ किमीच्या उड्डाणपुलामुळे आधीच देवळी शहर पूर्व-दक्षिण बाजूने तटबंद झाले आहे. आता, प्रस्तावित महामार्ग उत्तर, पश्चिम आणि दक्षिण दिशेने अवघ्या अर्ध्या ते एक किलोमीटर अंतरावरून जाणार असल्याने शहर चौफेर तटबंदीच्या कचाट्यात अडकणार आहे. त्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना आपल्या शेतात पोहोचण्यासाठी मोठ्या अडचणी येणार आहेत.

राजपात्रित नकाशानुसार, प्रस्तावित महामार्ग धोत्रा (रेल्वे)-पढेगाव-चिकणी-देवळी-काजळसरा असा वळणदार मार्ग प्रस्तावित आहे. देवळीकरांचे म्हणणे आहे की, धोत्रा-सेलसुरा-काजळसरा हा सरळ व नजीकचा मार्ग अधिक उपयुक्त ठरला असता. तसेच, वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्प धोत्रा (रेल्वे) ते काजळसरा हा एकसर मार्ग असताना महामार्ग प्राधिकरणाने अधिक लांब वळणदार मार्ग का निवडला, याचे उत्तर शोधण्यात स्थानिक नागरिक अडकल्याचे दिसत आहे.प्रस्तावित महामार्ग देवळीच्या उत्तरेकडील पुलगाव रोडवरील शेत क्र. ४३९, वायव्येकडील सोनेगाव (आ.) रोडवरील शेत क्र. ३००, पश्चिमेकडील डिगडोह रोडवरील शेत क्र. २१९ आणि नैऋत्येकडील नांदोरा (ड) रोडवरील शेत क्र. १८९ येथून जाणार आहे. हे सर्व शेत क्रमांक शहरापासून अवघ्या अर्ध्या ते एक किलोमीटर अंतरावर असल्याने भविष्यात देवळी तटबंदीचे शहर म्हणून ओळखले जाण्याची शक्यता आहे. तसेच, नगरपालिकेची हद्द मर्यादित राहिल्याने 'ब' वर्गाकडे वाटचाल करणारी देवळी नगर परिषद कायमस्वरूपी 'क' वर्गीय राहू शकते. औद्योगिक वसाहतीच्या विस्तारालाही मर्यादा येणार असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.महामार्गाच्या भिंतीमुळे तटबंदीबाहेरील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी मोठ्या अडचणी येणार आहेत. यामुळे महामार्ग शहरापासून किमान ५ किलोमीटर अंतरावर बांधण्याची मागणी देवळीकरांकडून करण्यात येत आहे. याशिवाय, सुपीक जमिनी नष्ट होणार असल्याने खर्डा (बो.) येथील अनेक शेतकऱ्यांनीही या महामार्गाला विरोध दर्शविला आहे.उंच भिंतीचा शक्तीपीठ महामार्ग शहराच्या इतक्या जवळ असल्याने देवळीच्या नगरपालिकेच्या विस्तारास अडथळा येईल. तसेच, भविष्यात औद्योगिक वसाहतीची संधीही मर्यादित होईल. त्यामुळे हा महामार्ग किमान ५ किलोमीटर लांब नियोजित करावा, अशी मागणी देवळीकरांनी केली आहे.

## नेवाळीपाड्यातील १५० वर्षे जुना झुंजारराव वाडा आगीत खाक



**ठाणे । प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील सरळगावजवळ असलेला १५० वर्षे जुना झुंजारराव वाडा शुक्रवारी आगीत जळून खाक झाला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र या आगीत १८ व्या शतकातील ऐतिहासिक वास्तूचा पूर्णतः नाश झाला.

हा वाडा जयराम झुंजारराव यांनी १८ व्या शतकात बांधला होता. शाहू महाराजांनी या वाड्याला भेट दिली होती, तसेच तत्कालीन महसूल विभागाचा कारभार येथून चालत असे. भारताचे माजी पंतप्रधान मोरारजी देसाई ठाण्याचे जिल्हाधिकारी असताना महसूल गोळा करण्यासाठी मुरबाडला येत आणि त्यांचा मुक्काम याच वाड्यात असे.या ऐतिहासिक ठेव्याच्या विनाशामुळे मुरबाडसह संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## लोकमान्य महाविद्यालय, वरोरा येथे माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न




**वरोरा । प्रतिनिधी**

लोकमान्य महाविद्यालयात दिनांक २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. श्रीकांत पाटील (अध्यक्ष, लोक शिक्षण संस्था, वरोरा) आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी प्रा. यामिनी नन्नावरे उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा. श्रीकांत पाटील यांनी माजी विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यातील संबंध निरंतर टिकणारे असल्याचे सांगून, विद्यार्थ्यांनी त्याची जाणीव ठेवावी आणि विविध योजनांच्या माध्यमातून हे संबंध कसे जोपासावेत याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री यांनी माजी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या जुन्या आठवणींना उजाळा देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. रवींद्र शेंडे यांनी केले, प्रस्तावना डॉ. श्रीनिवास पिलगुलवार यांनी केली, तर आभार प्रदर्शन डॉ. दीपक लोणकर यांनी मानले.या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिनाथ साखर कारखाना निवडणूक
# बागल गटाची निवडणुकीतून माघार

### आदिनाथसाठी बागल गटाचे सहकार्य राहील-घुमरे

**विलासराव घुमरे म्हणाले की, गेल्या वीस वर्षांत बागल गटाला अडचणीत आणण्यासाठी आदिनाथ कारखान्याला लक्ष्य करण्यात आले आहे. आम्ही फक्त निवडणुकीपुरते थांबलो आहोत, पण आदिनाथ कारखाना व्यवस्थित चालावा यासाठी आमचे सहकार्य कायम राहील.तसेच, जो कोणी आदिनाथच्या सत्तेवर येईल, त्याला बागल गट पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. शेवटी, बागल गटाच्या सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज तातडीने माघारी घ्यावेत, असे आवाहन घुमरे यांनी केले.यावेळी बागल गटाच्या वतीने अर्ज भरलेले सर्व उमेदवार आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**



**सोलापूर । प्रतिनिधी**

बागल गटाला राजकीय दृष्टिकोनातून अडचणीत आणण्याचा सातत्याने प्रयत्न झाला असून, श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याला लक्ष्य केले गेले आहे. या पार्श्वभूमीवर बागल गटाने उद्याच्या आदिनाथ साखर कारखान्याच्या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.बागल गटाच्या वतीने उमेदवारी अर्ज भरलेल्या सर्वांनी येत्या दोन दिवसांत अर्ज माघारी घ्यावेत, असे आवाहन गटाचे मार्गदर्शक विलासराव घुमरे यांनी बागल संपर्क कार्यालयात केले. या वेळी मकाई कारखान्याचे माजी चेअरमन आणि शिवसेना जिल्हा युवा नेते दिग्विजय बागल उपस्थित होते.

श्री आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीसाठी बागल गटाच्या वतीने ज्यांनी अर्ज भरले आहेत, त्यांची विचारविनिमय बैठक आज पार पडली. प्रारंभी लोकनेते माजी मंत्री दिवंगत दिगंबरराव बागल यांच्या प्रतिमेचे पूजन सोमनाथ पोटे आणि अंगद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मार्केट कमिटीचे माजी चेअरमन प्रा. शिवाजीराव बंडगर, आदिनाथचे चेअरमन धनंजय डोंगरे, चिंतामणी जगताप, कल्याणराव सरडे, रणजीत शिंदे, अंगद पाटील, केरू गव्हाणे, ड. नानासाहेब शिंदे आदी मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत सर्वांनी एकमुखाने निवडणुकीच्या संदर्भातील निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्षा आणि साखर संघाच्या संचालिका रश्मीदीदी बागल आणि मार्गदर्शक विलासराव घुमरे यांना दिला.शिवसेना युवा नेते दिग्विजय बागल यांनी सांगितले की, रश्मीदीदी बागल आणि विलासराव घुमरे जो निर्णय घेतील, तो सर्वांनी मान्य करावा.

## सुभाष उच्च प्राथमिक शाळा,मूल विद्यार्थ्यांच्या
# शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा उपक्रमशील प्रयत्न



**मूल । प्रतिनिधी**

विद्या प्रसारण मंडळ मूल संचालित सुभाष उच्च प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबवत आहे. याचाच भाग म्हणून डिजिटल मीडियाच्या पत्रकारांनी शाळेला भेट दिली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारण्यात आले, ज्यावर त्यांनी समर्पक उत्तरे देऊन आपली बौद्धिक क्षमता आणि शैक्षणिक तयारी सिद्ध केली. शाळेचे मुख्याध्यापक आणि संस्थेचे सचिव अविनाश जगताप यांनी सांगितले की, स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी टिकून राहावे म्हणून शाळेच्या शिक्षकांनी सातत्याने नवे उपक्रम राबवून अभ्यासाची गोडी निर्माण करण्याचे काम केले आहे.

संस्थेचे अध्यक्ष नरसिंग गणवेनवार यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या नवीन शैक्षणिक वर्षात शाळेचे उर्वरित काम पूर्ण करून तिला अधिक आधुनिक स्वरूप देण्यात येणार आहे. तसेच, अद्यावत डिजिटल शिक्षण प्रणाली लागू करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

सन १९९१ मध्ये अवघ्या १४ विद्यार्थ्यांसह सुरू झालेली ही शाळा आजच्या घडीला सेमी-इंग्रजी माध्यमातून इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत ४४२ विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. पुढील शैक्षणिक वर्षात डिजिटल शाळा म्हणून कार्यरत होणार असल्याची माहिती मुख्याध्यापक अविनाश जगताप यांनी दिली. डिजिटल मीडियाच्या पत्रकारांनी इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना विविध प्रश्न विचारले. यावर विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे दिली, ज्यामुळे पत्रकारांनी समाधान व्यक्त केले आणि शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक केले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष नरसिंग गणवेनवार, पदवीधर शिक्षक राजू गेडाम आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या उत्कृष्ट शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि गुणवत्ता यामुळे शाळेचे नाव संपूर्ण परिसरात अग्रस्थानी आहे.

# सातारा जिल्ह्यात रेव्ह पार्ट्यांना बंदी पोलिसांना कठोर कारवाईचे आदेश
# जिल्हाधिकारी संतोष पाटील

**सातारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात रेव्ह पार्ट्यांना कोणतीही परवानगी दिली जाणार नाही तसेच अंमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी पोलिसांना दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर समितीची बैठक जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला उप जिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, पोलिस उप अधीक्षक अतुल सबनिस, राज्य गुप्त वार्ता विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश शिंदे, अन्न व औषध प्रशासन निरीक्षक व्ही. व्ही. पाटील तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत अंमली पदार्थांचे सेवन आणि विक्री रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. नशेसाठी काही औषधांचा गैरवापर होतो, त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने अशा औषधांच्या विक्रीबाबत सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.अवैध गांजा व अफूच्या शेतीवर पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे आणि अशा बेकायदेशीर शेतीस आळा घालावा. अंमली पदार्थांचे दुष्परिणाम याविषयी महाविद्यालयांमध्ये जनजागृती मोहीम राबवावी. जिल्ह्यातील हॉटेल्स, लॉज यांची पोलिसांनी नियमित तपासणी करावी आणि संशयास्पद बाबी आढळल्यास तातडीने गुन्हे दाखल करावेत.अंमली पदार्थ विक्रीच्या ठिकाणी पोलिसांनी अचानक छापे टाकून कठोर कारवाई करावी. ड्रग्स पकडल्यानंतर तपासणीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून आवश्यक यंत्रसामग्री खरेदी करण्याची सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.जिल्ह्यात रेव्ह पार्ट्या चालू देणार नाहीत आणि अंमली पदार्थांच्या विक्रीस आळा घालण्यासाठी कठोर कारवाई केली जाईल, असा ठाम निर्धार जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी व्यक्त केला.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून महाकाली यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसराची पाहणी

## महाकाली यात्रेसाठी २ कोटी ९० लक्ष रुपयांचा निधी; सोयीसुविधांसाठी विशेष प्रयत्न

## महाकाली यात्रेतील दुकाने नियोजनबद्ध रेखांकन करुन निश्चित केली जाणार

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

चैत्र पौर्णिमेच्या निमित्ताने महाकाली मंदिर येथे मोठ्या उत्साहात यात्रा होत असते. महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधून भाविक मोठ्या श्रद्धेने येथे हजेरी लावतात. माता महाकालीला साष्टांग दंडवत करून भक्त झरपट नदीत स्नान करतात. नदीतील पाण्याला तीर्थाप्रमाणे महत्त्व आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यात्रेचे व नदीचे पावित्र्य जाणून यात्रेकरूंच्या सोयीसुविधांसाठी पुढाकार घेतला आहे. महाकाली यात्रेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मंदिर परिसराची शनिवारी ( दि.२९) पाहणी केली. या यात्रेच्या नियोजनासाठी आणि सोयीसुविधांसाठी राज्य सरकारने मोठा आर्थिक हातभार लावला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यात्रेसाठी २ कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून भाविकांसाठी विविध सुविधा उभारण्यात येत आहे. झरपट नदी परिसराची स्वच्छता करण्यात आली असून उर्वरित स्वच्छतेचे काम देखील सुरू आहे. भविष्यात यात्रेसाठी स्थायी यंत्रणा निर्माण करण्याचे नियोजन प्रशासनाने आखले असल्याचे आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

आ. मुनगंटीवार यांच्या पाहणी दौऱ्याच्या वेळी भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, महामंत्री सुरज पेद्दुलवार,सोहम बुटले,मनपाचे शहर अभियंता बोरीकर,संदीप आगलावे, पुरुषोत्तम सहारे, रवी लोणकर, दिनकर सोमलकर आदींची यावेळी उपस्थिती होती.यात्रेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आ. मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकारी आणि मनपा आयुक्तांसोबत विशेष चर्चा देखील करण्यात आली आहे. भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारल्यास यात्रा अधिक भक्तीमय आणि पवित्र वातावरणात पार पडेल, असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.महाकाली यात्रेदरम्यान अनेक छोटे-मोठे दुकानदार आपला व्यवसाय करतात आणि भक्तांची सेवा करतात. मात्र, अलीकडे प्रशासनाच्या नियमांमुळे काही व्यापाऱ्यांना अडचणी निर्माण होत आहेत. यासंदर्भात व्यवस्थापन योग्य व्हावे आणि गेल्या ४० ते ५० वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्रास होऊ नये, यासाठी आ. मुनगंटीवार यांनी महाकाली मंदिर परिसरात प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या परिसरातील कोणतीही दुकाने हटविण्यात येणार नाहीत, ती पूर्वीप्रमाणेच राहतील. मात्र, दुकाने रस्त्यावर येऊ नयेत यासाठी नियोजनबद्ध रेखांकन करून त्यांची निश्चित मर्यादा प्रशासनाकडून ठरवली जाणार असल्याचे आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यावेळी म्हणाले.



## शेतकऱ्यांना सालदार मिळेना वाढत्या मजुरीमुळे अडचणीत शेती

**देवळी | संतोष तुरक**

मराठी नववर्ष गुढीपाडव्याच्या आगमनाने शेतकऱ्यांसाठी नव्या शेती हंगामाची सुरुवात होते. मात्र, सध्या शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे ठाकले आहे - ते म्हणजे मजुरांची कमतरता आणि वाढत्या मजुरीचे दर. दिवसेंदिवस शेतमजुरांची संख्या घटत असून, सालदाराचे भाव गगनाला भिडले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना शेती कशी करावी, हा प्रश्न पडला आहे.शेतीमध्ये वाढता उत्पादन खर्च, शेतमालाला मिळणारे अत्यल्प भाव, वाढती मजुरी आणि मजुरांची टंचाई यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. सालदार मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना एक ते दीड लाख रुपये मोजावे लागत आहेत. यामुळे शेती परवडत नाही, असे मत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

गुढीपाडव्याला पुढील वर्षभरासाठी शेतकऱ्यांना सालदार ठेवावा लागतो. मात्र, वाढत्या मजुरीमुळे ही प्रक्रिया अडचणीत आली आहे. उत्पन्नाच्या तुलनेत वाढलेला शेतीचा खर्च आणि मजुरीचे दर पाहता, शेती कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे.जयंत पुरुषोत्तम भोयर, शेतकरी, सोनेगाव (आ): माझ्याकडे ४० एकर शेती असून, माझ्या आई-वडिलांच्या काळापासून आम्ही सालदार ठेवत आहोत. पूर्वी गहू आणि रोख रक्कम देऊन सालदार ठेवला जायचा. मात्र, मागील वर्षी ९० हजार तर यावर्षी १ लाख १८ हजार रुपये द्यावे लागत आहेत. दिवसेंदिवस मजुरांची कमतरता आणि कमी मिळणारे उत्पन्न यामुळे शेती करणे कठीण होत आहे.

राजू इंगोले, शेतकरी, नांदुरा डफरे: माझ्याकडे १० एकर शेती असून काही शेती मी मक्त्याने करतो. मागील वर्षी १ लाख रुपयांमध्ये सालदार मिळाला होता. मात्र, यावर्षी सालदाराचे भाव १.५ लाखांवर गेले आहेत. जर शेतमालाला योग्य भाव मिळाला, तर शेतकऱ्यांचे काहीसे हाल हलके होतील.शरद आदमने, शेतकरी, देवळी: माझ्याकडे १५ एकर शेती आहे. मागील वर्षी सालदार १ लाख ४० हजार रुपयांना ठेवला होता. मात्र, यावर्षी सालदार मिळणे कठीण झाले असून, त्याचा दर २ लाखांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय शेतीकामासाठी मजूरही मिळत नाहीत. त्यामुळे शेती करावी कशी, हा प्रश्न निर्माण झाला आहे.शासन मोठमोठ्या घोषणा करते, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळत नाही. शेतीवरील वाढता खर्च, मजुरांची कमतरता आणि मिळणारे कमी उत्पन्न यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. यामुळे काही शेतकरी शेती करण्यासही नाखूश होत आहेत. शासनाने या समस्येकडे त्वरित लक्ष देऊन शेतकऱ्यांसाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.गुढीपाडव्याच्या या शुभमुहूर्तावर शेतकऱ्यांसाठी नवे वर्ष समृद्धीचे आणि समाधानाचे जावो, हीच इच्छा!

## करंजी भोगे येथे सुरू असलेल्या कामाची चौकशी करा : प्रादेशिक जलसंधारण अधिकाऱ्यांना निवेदन

**वर्धा | प्रतिनिधी**

मृद व जलसंधारण विभाग, नागपूर अंतर्गत करंजी (भोगे) येथे सुरू असलेल्या नाला खोलीकरणाच्या कामात दगडी पिचिंग करून द्यावे, तसेच या कामाच्या सखोल चौकशीसह संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी खटके यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.करंजी (भोगे) येथे नाला खोलीकरणाच्या कामाला मंजुरी मिळाली असून, सदर काम सुरू आहे. मात्र, या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता असून, कंत्राटदार आपल्या मनमर्जीप्रमाणे काम करत आहे. अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका आणि कार्यारंभ आदेश न दाखविता तसेच शेतकऱ्यांना विश्वासात न घेता, कंत्राटदार डोंगरे हे दडपशाहीची भाषा वापरून काम करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

करंजी भोगे गावालगत मोठा नाला असून, पावसाळ्यात त्याला पूर येतो. परिणामी, नाल्यालगतच्या शेतजमिनी खरडून जातात आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते.



याकरिता, नाल्याच्या वळण मार्गावर दगडी पिचिंग करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अन्यथा दरवर्षी नाल्याच्या कडा खचून जैसे थे स्थिती राहील, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय, आवश्यक ठिकाणी पाईप बसवून पाणी प्रवाह सुरळीत करण्याची मागणीही करण्यात आली आहे. अन्यथा, या कामाला तत्काळ स्थगिती द्यावी, असा आग्रह धरण्यात आला आहे.शेतकऱ्यांचे पावसाळ्यात नुकसान होऊ नये म्हणून शासन जलसंधारण विभागामार्फत कोट्यवधी रुपयांचा खर्च करत आहे. मात्र, प्रत्यक्षात या निधीचा अपव्यय होत असल्याचे चित्र आहे. संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांचे संगनमत उघड होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने भ्रष्टाचाराविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.या प्रसंगी शेतकरी नेते रविराज घुमे, सुभाष मून, अमर कुलकर्णी, दिलीप गुप्ता, रमाबहाद्दूर चौधरी आणि अनेक शेतकरी उपस्थित होते.

## पुलगाव आगारासाठी नवीन बसेसची मागणी


**वर्धा | प्रतिनिधी**

देवळी पुलगाव मतदारसंघातील आमदार राजेश बकाने यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन देवळी पुलगाव मतदारसंघातील बस आगारांच्या दुरवस्थेची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासाची बाब मांडत या भागासाठी नवीन बसेसची गरज असल्याचे स्पष्ट केले.यावेळी आमदार बकाने यांनी देवळी विधानसभेतील बस आगारांसाठी २० नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यांच्या या मागणीवर परिवहन मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच या भागाला नवीन बसेस मिळण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे विशेषतः पुलगाव-देवळी मार्गावर प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या जुन्या आणि दुरुस्तीसाठी वारंवार बंद पडणाऱ्या बसेसच्या समस्येमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नवीन बसेस उपलब्ध झाल्यानंतर त्यांच्या प्रवासाचा त्रास कमी होईल आणि शिक्षणासाठी आवश्यक असलेली वाहतूक सुविधा सुधारेल. याबाबत नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय अत्यंत लाभदायक ठरणार आहे.













सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .